प्रशासकीय मान्यता
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे श्रेणीवर्धनअंतर्गत अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या नविन इमारतीचे (तळमजला + ५ मजला) बांधकाम करणे

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : जीडीएन-२०१७/प्र.क्र.३२५/प्रशा-१
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नविन मंत्रालय,
९ वा मजला, लोकमान्य टिळक रोड, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १३ एप्रिल, २०१८.

वाचा : संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक : संवैशिवसं/ शादंमरुना/ अतिविशेषोपचार/रुग्णालयबांध/११५२४/प(आय)/१७, दिनांक : ०७.१०.२०१७

शासन निर्णय :

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील श्रेणीवर्धनअंतर्गत अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या नविन इमारतीचे (तळमजला + ५ मजला) बांधकाम करण्याकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या व सचिव समितीने मान्यता दर्शविलेल्या एकूण रुपये २२४७.४० लक्ष (अक्षरी रुपये बावीस कोटी सत्तेचाळीस लक्ष चाळीस हजार फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये लक्ष मध्ये)

अ. क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सचिव समितीने मान्यता दर्शविलेली किंमत रुपये
१.	शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे श्रेणीवर्धनअंतर्गत अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या नविन इमारतीचे (तळमजला + ५ मजला) बांधकाम करणे.	२६११.८८	२२४७.४०
	एकूण	**२६११.८८**	**२२४७.४०**

अटी व शर्ती :-

१) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबात काम करतेवेळी विस्तृत दरपृथ:करणे व अंदाजपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) प्रस्तुत काम अर्थसंकल्पाव्यतिरिक्त करावयाचे झाल्यास ५% सेंटज चार्जेस मिळविण्यात यावेत.

५) काम सुरु करणेपूर्वी सविस्तर कामांचे नकाशे वास्तुविशारदांकडून तयार करुन घ्यावे व काम करतांना अस्तित्वांतील इतर इमारतींना धोका पोहोचणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अभियंता/अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

७) कामासाठी जागेची उपलब्धता, जागा पुरेशी आहे किंवा नाही, याबाबतची खात्री संबंधीत संस्था प्रमुखांनी करावी.

८) प्रस्तावित नविन इमारतीचे काम सुरु करताना सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन काम करावे. यावर संबंधीत संस्थेचे अधिष्ठाता यांनी लक्ष ठेवावे व निधीची आवश्यकता तसेच कामाच्या प्रगतीचा अहवाल याबाबत शासनास वेळोवेळी अवगत करावे.

९) संबंधीत संस्थेच्या अधिष्ठातांनी या विभागाचे शासन परिपत्रक दिनांक ७.२.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

२. सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये. निधीची तरतूद झाल्यानंतर सदर काम हे खाली नमूद केलेल्या लेखाशीषाअंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

मागणी क्रमांक - एच-८
४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३, वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन,
१०५-विषमचिकित्सा पंचवार्षिक योजनांतर्गत
(४२१० १७४५) ५३- मोठी बांधकामे

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच

मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४८१/इमा-३, दिनांक ०८.०७.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने तसेच सचिव समितीने दिनांक २०.०३.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१३१७०३२३२६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.04.13 17:42:38 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर.
४) सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-१/३) मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम नागपूर प्रादेशिक विभाग, नागपूर.
६) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,एकात्मिक घटक (वैद्यकीय) नागपूर.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर .
८) निवडनस्ती (प्रशा-१).